# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.10.2024** **वारःगुरुवार**

---

ठळक बातम्या.

- हरियाणाच्या मुख्यमंत्रिपदी नायबसिंह चैनी यांचा आज शपथविधी.
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तीन दिवसांच्या मालावी दौऱ्यावर.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी आज अभिधम्म दिवस आणि पाली भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानिमित्त आयोजित समारंभात उपस्थित राहणार.
- खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जरच्या हत्येसंदर्भात भारतावर आरोप करताना पुरावे नसल्याची कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडू यांची कबुली. बिघडलेल्या संबंधांची जबाबदारी एकट्या ट्रुडोंवर असल्याचं भारताची भूमिका.

आणि

- भारत - न्यूझीलंड क्रिकेट कसोटीत काल पहिल्या दिवशीच्या पावसानंतर आज दुसऱ्या दिवशी नाणेफेकीपासून सुरुवात होणं अपेक्षित.

हरियाणा शपथविधी

हरियाणाच्या मुख्यमंत्रिपदी नायबसिंह चैनी यांचा आज सलग दुसऱ्यांदा शपथविधी होत आहे. पंचकुलामधील शालिमार मैदानावर हा शपथविधी होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी या समारंभाला उपस्थित राहणार आहेत. चैनी यांनी काल राज्यपाल बंडारू दत्तात्रेय यांची भेट घेतली आणि त्यात सरकारस्थापनेचा दावा केला. चैनी यांच्या शपथविधीसाठी सुरक्षा व्यवस्था कडेकोट करण्यात आली आहे.

राष्ट्रीय लोकशाही आघाडी

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या मुख्यमंत्र्यांची आणि उपमुख्यमंत्र्यांची परिषद आज चंडीगडमध्ये होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी तिचं अध्यक्षपद भूषवणार आहेत. चैनी यांच्या शपथविधीनंतर ही परिषद होणार असल्याचं भारतीय जनता पार्टीनं म्हटलं आहे. राष्ट्रीय विकासाशी संबंधित मुद्यांवर परिषदेत चर्चा होणार आहे.

मोदी पाली भाषा समारंभ

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज अभिधम्म दिवस आणि पाली भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानिमित्त आयोजित समारंभात उपस्थित राहणार आहेत. आंतरराष्ट्रीय बुद्धिस्ट महासंघानं सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्यानं हा कार्यक्रम आयोजित केला आहे. पंतप्रधान या प्रसंगी अभिधम्म दिवसाचं आणि पाली भाषेचं महत्त्व, तसंच बौद्ध धम्माचा समृद्ध वारसा जपण्यासाठी सरकारकडून सुरू असलेले प्रयत्न याविषयी आपले विचार  मांडणार आहेत. पाली भाषेला नुकताच मराठी आणि इतर चार भाषांसह अभिजात भाषेचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे.

राष्ट्रपती दौरा

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून 19 तारखेपर्यंत मालावीच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या तीन दिवसांच्या दौऱ्यात राष्ट्रपती मालावीमध्ये द्विपक्षीय बैठका घेणार आहेत आणि तिथल्या भारतीय समुदायाशी संवाद साधणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल मॉरिटॅनियाचे अध्यक्ष मोहंमद औल्ड घझौनी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. राष्ट्रपतींनी काल शिष्टमंडळ स्तरावरच्या चर्चेतही भाग घेतला. उभय देशांमधले संबंध दृढ करण्यासाठी चार संयुक्त सहकार्य करारांवरही काल स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा यांना बळ देण्यासाठी परस्परांशी चर्चा करणं, परदेशी संबंधविषयक प्रशिक्षण संस्थांना सहकार्य करणं, राजनैतिक आणि अधिकृत पासपोर्टधारकांसाठी व्हिसाचे नियम शिथिल करणं आणि उभय देशांमध्ये सांस्कृतिक देवाणघेवाणविषयक कार्यक्रम आयोजित करणं यांच्याबाबत हे करार करण्यात आले आहेत.

कॅनडा ट्रुडो

खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जरच्या हत्येसंदर्भात भारत आणि भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यांवर आरोप करताना कॅनडानं कोणतेही पुरावे दिलेले नाहीत असा भारतानं पुनरुच्चार केला आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडू यांनी चौकशी आयोगापुढे बोलताना आरोप करताना पुरावे नसल्याची कबुली दिल्याच्या बातम्यांवर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ट्रुडू यांची कबुली म्हणजे भारत इतके दिवस जे म्हणत होता त्यावर शिक्कामोर्तब झाल्याचं जैस्वाल यांनी म्हटलं आहे. भारत आणि कॅनडा यांच्यातल्या बिघडलेल्या संबंधांची जबाबदारी केवळ ट्रूडू यांच्यावर असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं आहे. तत्पूर्वी, हरदीपसिंग निज्जरच्या हत्येमध्ये भारताचा कथित सहभाग असल्याचा आपल्या सरकारकडं कोणताही पुरावा नसल्याचं ट्रुडू यांनी मान्य केलं आहे. एका चौकशी समितीपुढे बोलताना ट्रूडू यांनी आपले आरोप हे गुप्तचरांकडून मिळालेल्या कमकुवत माहितीवर आधारित होते आणि त्यात ठोस पुरावा नव्हता, अशी कबुली दिली आहे.

केंद्रीयमंत्री मंडळ

रबी पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्यास केंद्रीय मंत्रीमंडळानं काल मान्यता दिली. ही वाढ 2025 - 26 या पणन हंगामासाठी आहे. केंद्रीय मंत्रीमंडळाची बैठक काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या बैठकीत घेतलेल्या निर्णयांची माहिती वार्ताहर परिषदेत दिली.

मोहरीच्या किमतीत सर्वाधिक 300 रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली असून मसूर डाळींच्या किमतींत 275 रुपयांची वाढ करण्यात आली आहे. हरभरा डाळीच्या किमतीत 210 तर गव्हाच्या एमएसपी मध्ये दीडशे रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यामध्ये 3 टक्क्यांची वाढ करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रीमंडळानं घेतला आहे. या निर्णयाचा लाभ 49 लाख कर्मचारी आणि सुमारे 64 लाख निवृत्तीवेतन धारकांना होणार आहे.

भाजपा-बैठक

भारतीय जनता पार्टीच्या मध्यवर्ती निवडणूक समितीची बैठक काल संध्याकाळी नवी दिल्लीत पार पडली. महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची नावं निश्चित करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, भाजपाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा आणि इतर वरिष्ठ नेते या बैठकीला उपस्थित होते. दरम्यान, विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर महाराष्ट्रात जिल्हयाजिल्ह्यात प्रशासन निवडणूकीसाठी सज्ज होत आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये निवडणूक तयारी आढावा बैठका घेतल्या जात आहेत. निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकाऱ्यांनी राजकीय पक्षांना सहकार्य करण्याचं आवाहन केलं आहे. सर्वांना बॅनर, फलक तातडीनं काढून टाकण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर दिवाळीच्या काळात राजकीय पक्ष किंवा उमेदवारांकडून दिल्या जाणाऱ्या भेटवस्तूंवर निवडणूक आयोगाचं बारीक लक्ष असणार आहे. सर्वसामान्य नागरिक आपल्या तक्रारी C-VIGIL ॲपवर नोंदवू शकतात, अशी माहिती महाराष्ट्राचे अतिरीक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली.

भारत निर्यात

भारताची निर्यात एप्रिल ते सप्टेंबर या सहामाहीत चार पूर्णांक 86 शतांश टक्क्यांनी वाढून 393 अब्ज 22 कोटी डॉलरवर पोचली आहे. गेल्या वर्षी याच सहामाहीत ती 375 अब्ज डॉलर इतकी होती. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं ही माहिती दिली आहे.

या सहामाहीत व्यापारी मालाची निर्यात 1 पूर्णांक 2 शतांश टक्क्यांनी वाढून 213 अब्ज 22 कोटी डॉलरवर पोचली आहे, तर सेवा क्षेत्रातली निर्यात 9 पूर्णांक 81 दशांश टक्क्यांनी वाढली आहे. यंदा

सप्टेंबर महिन्यातच निर्यातीत तीन पूर्णांक 76 टक्क्यांची वाढ झाली आहे. अभियांत्रिकी उत्पादनं, रसायनं, प्लॅस्टिक, औषधं आणि वस्त्रप्रावरणं यांच्यामुळे निर्यातीला बळ मिळालं आहे. नेदरलँड्स, संयुक्त अरब आमिरात, अमेरिका, ब्राझिल आणि जपान या देशांमध्ये निर्यात जास्त झाली आहे. सध्या जगभरात भूराजकीय संघर्ष आणि आर्थिक समस्या सुरू असतानाही भारताची निर्यात वाढत आहे ही चांगली स्थिती असल्याचं भारतीय निर्यात संघटनांच्या महासंघाचे अध्यक्ष अश्विनीकुमार यांनी म्हटलं आहे.

तामिळनाडू-पाऊस

तामिळनाडूजवळ चेन्नईपासून 320 किलोमीटर वर समुद्रात कमी दाबाचं क्षेत्र तयार झालं असून त्याचा परिणाम म्हणून तामिळनाडूमध्ये आज मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. चेन्नई, कांचीपुरम, तिरूवल्लुर आणि चेंगलापेट जिल्ह्यांमध्ये दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. तमिळनाडू प्रशासन संभाव्य आपत्कालीन परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. तटरक्षक दल तसंच राज्य आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दलाच्या तुकड्या सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

फुटबॉल

नेपाळमध्ये सुरू असलेल्या SAFF महिलांच्या फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धांमध्ये भारताचा सलामीचा सामना आज पाकिस्तान बरोबर होत आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी सव्वा पाच वाजता सामना सुरू होईल. स्पर्धांच्या अ गटात भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश असून ब गटात नेपाळ, भूतान, मालदिव आणि श्रीलंकेचा समावेश आहे. अंतिम सामना 30 तारखेला खेळला जाणार आहे.

क्रिकेट

भारत - न्यूझीलंड क्रिकेट कसोटीचा पहिला दिवस काल बंगळुरु इथं पावसामुळं वाहून गेला. दुसऱ्या दिवशी आज नाणेफेकीपासून सुरुवात होणं अपेक्षित आहे. याआधी भारतानं बांग्लादेशविरुद्धची मालिका 2-0 अशी जिंकली आहे तर न्यूझीलंड श्रीलंकेविरुद्धची मालिका हरला आहे. विश्व कसोटीच्या वर्तमान क्रमवारीत भारत सध्या अग्रस्थानी, तर न्यूझीलंड सहाव्या स्थानी आहे.

डेन्मार्क बॅडमिंटन

डेन्मार्क खुल्या बॅडमिंटनस्पर्धांच्या महिला गटात भारताची बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधूची गाठ आज उपउपांत्यपूर्वफेरीत चीनच्या हान यू हिच्याशी पडणार आहे. स्पर्धांच्या पहिल्या सामन्यात प्रतिस्पर्ध्यानंसामना अर्ध्यावर सोडून दिल्यामुळे सिंधूला पुढे चाल मिळाली होती.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**